पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७५० /२०२३ दि. १६/०९/२०२३

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** वाहतुक उपविभाग विठ्ठलवाडी हद्दित दि. १९/०९/२०२३ ते २८/०९/२०२३ या कालावधीत गणेशोस्तव सण साजरा होणार आहे. गणेश मुर्ती विसर्जनाचे दिवशी म्हणजेच दिनांक २८/०९/२०२३ (अनंत चर्तुदशी) या दिवशी गणेशमुर्ती विसर्जनासाठी निघणा–या मिरवणुकींमुळे वाहतूकीची कोंडी होवू नये. तसेच सदर भागात वाहतूक सुरळीत व सुरक्षीत रहावी याकरिता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद–** १) श्री राम चौक–ओ.टी सेक्शन चौक–मेनबाजार–व्हिनस चौक–नेताजी चौक–भाटीया चौक–३९ सेक्शन–गाऊन बाजार–दुध नाका–मठ मंदिर चौक या विसर्जन मार्गावरील वाहतुक तसेच रहदारी हि गणपती विसर्जन मिरवणुक पुढील चौकात जाई पर्यत **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** अ) श्रीराम चौकाकडून ओटी सेक्शनकडे जाणारी वाहने पेट्रोलपंपाचे बाजूने व्हि.टी.सी.रोडमार्गे इच्छीत स्थळी जातील.

ब) ओ.टी सेक्शन कडून मेन मार्केट कडे जाणारी वाहतुक ही उल्हास स्टेशन कडे मार्गे इच्छीत स्थळी जातील.

क) नेताजी चौकाकडुन व्हिनस चौकाकडे जाणारी वाहने लालचक्की चौक व मानेरेगाव रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

ड) कैलास कॉलनी कडुन भाटीया चौक व नेताजी चौकाकडे येणारी वाहतुक ही संभाजी चौक व उल्हासनगर स्टेशन मार्गे इच्छीत स्थळी जातील.

ई) दुधनाका कडुन गाऊन मार्केटकडे येणारी वाहतुक ही ओ.टी सेक्शन उल्हासनगर ५ मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**नो पार्किंग–** २) श्री राम चौक–ओ.टी सेक्शन चौक–मेनबाजार–व्हिनस चौक–नेताजी चौक–भाटीया चौक–३९ सेक्शन–गाऊन बाजार–दुध नाका–मठ मंदिर चौक या विसर्जन मार्गावर जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना दिनांक २८/०९/२०२३ रोजी दुपारी १४:०० ते रात्री २४:०० वाजेपावेतो **'नो पार्किंग'** करण्यात येत आहे.

**पार्किंग मुभा–** श्री राम चौक–ओ.टी सेक्शन चौक–मेनबाजार–व्हिनस चौक–नेताजी चौक–भाटीया चौक–३९ सेक्शन–गाऊन बाजार–दुध नाका–मठ मंदिर चौक हा मुख्य विसर्जन मार्ग सोडून इतर पर्यायी मार्गावर पार्किंग मुभा देण्यात येत आहे.

सदरची वाहतूक अधिसचुना ही दिनांक २८/०९/२०२३ (अनंत चर्तुदशी) या गणेश विसर्जन दिवशी दुपारी १४.०० वा. पासून गणेश मुर्ती विसर्जन कार्यक्रम संपे पर्यंत अंमलात राहिल.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी,ठाणे

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली व उल्हासनगर म.न.पा.

**प्रत कार्यवाहीसाठी:–**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,कल्याण,

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ व ४ व विशेष शाखा, ठाणे

प्रत:– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

सपोआ वाहतूक विभाग उल्हासनगर व कल्याण, पोनि. उल्हासनगर /विठठलवाडी/कल्याण वाहतूक उपविभाग.

२/– उल्हासनगर म.न.पा. संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.